# नियमावली

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचा वापर चर्चासत्र, परिसंवाद, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम,बालनाटये,करमणुकीचे कार्यक्रम,पोवाडे यासाठी करता येईल. मात्र तमाशा, लोकनाटय, लावणी , ऑर्केस्ट्रा असे कार्यक्रम करता येणार नाहीत.

२. ‘‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य ’’ या तत्वावर संपुर्ण भाडे (अनामत रक्कम व इतर अनुषंगिक भाडे) स्विकारून प्रेक्षागृह व कॉन्फ रन्स हॉलची मागणी अर्जदार/संयोजकाने केल्यास त्यासाठी निश्चित केलेल्या छापील अर्जामध्ये कार्यक्रमाच्या संबंधीत मुद्देसूद माहिती नमूद केली पाहिजे.

३. मागणी अर्जासोबत प्रेक्षागृहासाठी अनामत (डिपॉझिट) म्हणून रोख रू.१०००/- व कॉन्फ रन्स हॉलसाठी रू. २००/- याप्रमाणे अर्जदार/संयोजकास भरावे लागतील. कार्यक्रमानंतर अर्जदार/संयोजकाने लेखी मागणी केल्यास अनामत रक्कम नियमानुसार परत करण्यात येईल.

४. आरक्षणासाठी किमान १५ (पंधरा) दिवस अगोदर अर्ज करून १० दिवस अगोदर प्रेक्षागृह भाडे भरून घेतले जातील. फ ोनवरून अगर तोंडी सांगण्यावरून आरक्षण होणार नाही. प्रेक्षागृह भाडे हे चार तासाचे राहील.

५. एखाद्या संस्थेस एकच कार्यकम लागोपाठ दुपारी व रात्री अशा दोन्ही सत्रामध्ये करावयाचा असेल व पुढचे सत्र रिकामे असेल तरच अशा दोन्ही सत्रांसाठी प्रेक्षागृह उपलब्ध करून दिले जाईल.

६. कार्यक्रमाच्या भाडयाची संपुर्ण रक्कम अर्जदार/संयोजकाने कार्यकमाच्या दिनांकापूर्वी किमान १० दिवस अगोदर भरली पाहिजे तसे न केल्यास सदर दिनांकास प्रेक्षागृह इतरांस देण्याचा अधिकार व्यवस्थापक यांना राहील.

७. काही कारणास्तव कार्यक्रम रद्द झाल्यास व तसे अर्जदार/संयोजक ांनी किमान ७ दिवस अगोदर लेखी कळविल्यास भरलेले भाडे रिफंड देण्यात येईल. मात्र भरलेल्या भाडे रकमेतून भरण्यात आलेला सेवाकर वजा जाता शिल्लक रक्कमेतून १५ टक्के रक्कम कापून घेण्यात येईल.

मागील पानावर..

८. प्रेक्षागृह कार्यक्र मापूर्वी अर्धा तास अगोदर अर्जदार/संयोजकास उपलब्ध करून दिले जाईल. व कार्यकमानंतर अर्ध्या तासात अर्जदार/संयोजकाने प्रेक्षागृह रिकामे करून दिले पाहिजे. व कार्यक्र म सुरू होण्यापुर्वी भाडे पावती सादर केल्याशिवाय प्रेक्षागृहात प्रवेश मिळणार नाही.

९. प्रेक्षागृहात होणारा कार्यक्रम हा ठरविलेल्या वेळेत संपविला पाहिजे. तसेच रात्री ९ ते १२ चे सत्रामध्ये कार्यक्रम रात्री १२ पर्यंत संपविला पाहिजे अन्यथा कार्यक्रमाची वेळ संपताच प्रेक्षागृह ताब्यात घेण्याचे सर्व अधिकार व्यवस्थापकांना राहतील. ठरवून दिलेल्या वेळेत कार्यकम संपविण्याची जबाबदारी अर्जदारावर/संयोजकावर राहील.

१०. प्रेक्षागृह ताब्यात दिल्यापासून ते रिकामे करून परत देईपर्यंतच्या वेळेत त्याची खराबी अगर नुकसानी होणार नाही याची जबाबदारी अर्जदार/संयोजकावर राहील. जर इमारतीची अगर त्यातील फ र्निचर, फि टींग्ज, पेन्टींग, विजेची उपकरणे अगर इतर साधनसामुग्री यांची काही खराबी अगर नुकसानी झाल्यास त्याची जबबादारी अर्जदार/संयोजकावर राहील. व त्याबद्दल मा.खाते प्रमुख ठरवतील ती नुकसान भरपाई अर्जदार/संयोजकास भरून द्यावी लागेल. सदरची नुकसानीची रक्कम अनामत रक्कमेतून वसूल करण्याचा अधिकार व्यवस्थापक यांना राहील.

११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन प्रेक्षागृहात होणाऱ्या कार्यक्रमामुळे इतर क ोणाच्या हक्काचा भंग झाला असेल तर त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार / संयोजक यांचेवर राहील.

१२. प्रेक्षागृहाचा उपयोग करण्यासाठी अर्जदारास/संयोजकांस दिलेली परवानगी रंगमंच, रंगपट, प्रेक्षागृह व त्याच्याशी संबंधीत मार्ग व परिसर एवढापुरता मर्यादित राहील. इमारतीच्या इतर भागात प्रवेश मिळण्याचा अधिकार या परवानगीने अर्जदार/संयोजकास अगर कार्यक्रमाशी संबंधीत असलेल्या अन्य कोणासही प्राप्त होत नाही.

१३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन प्रेक्षागृहात सुसज्ज रंगमंच,ध्वनीव्यवस्था, प्रकाश व्यवस्था व शीत व्यवस्था आहे. या सर्व तरतुदी कार्यक्षम ठेवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल. जनरेटरची सोय उपलब्ध असल्याने प्रति तासास रू. २००/- प्रमाणे

मागील पानावर..

संबंधीत अर्जदार/संयोजकाकडून त्याचे भाडे आकारले जाईल.परंतू काही अपरिहार्य कारणामुळे जनरेटर देता न आल्यास त्याबाबत व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही. अशावेळी जनरेटरची व्यवस्था अर्जदार/संयोजक यांनी स्वत:करणे आवश्यक राहील. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन प्रेक्षागृहातील रंगमंचावरील बैठक व्यवस्था, साऊंड सिस्टीम व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था (द्वारपालनासहीत) अर्जदार/संयोजक यांची राहील.

१४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात व प्रेक्षागृहात थुंकणे, धुम्रपान करणे, गुटखा खाणे, तंबाखु खाणे, कचरा टाकणे, इत्यादी बाबींना मनाई राहील अशा प्रकारचे कृत्य करताना आढळल्यास जागेवर रक्कम रूपये ५०/- दंड करण्याचा अधिकार व्यवस्थापक यांना राहील. तसेच बेशिस्त अथवा गैरवर्तन करताना आढळल्यास अशा व्यक्तीला प्रेक्षागृहाबाहेर काढण्याचा अधिकार व्यवस्थापक यांना राहील.

१५. प्रेक्षागृहात बाहेरील खाद्य पदार्थ व पेय घेऊन जाण्यास सक्त मनाई राहील.

१६. अर्जदार / संयोजक यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या आवारात किंवा त्याच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या वाद्य वादनाची वा ध्वनिक्षेपकांची योजना पूर्वपरवानगी शिवाय करता येणार नाही.

१७. कार्यक्रमासाठी आवश्यक असणारे कलावंत, रंगमंच व रंगपट याकामासाठी लागणारे सहाय्यक यांना योग्य ते बिल्ले किंवा प्रवेशपत्रिका अर्जदार/संयोजक यांनी दिल्या पाहिजेत. असे बिल्ले किंवा प्रवेश पत्रिका असणाऱ्यांनाच भवनात व प्रेक्षागृहात प्रवेश दिला जाईल.

१८. प्रेक्षागृहात कार्यक्रमाच्या वेळी जरूरीप्रमाणे पोलिस मदतीची व्यवस्था अर्जदार/संयोजक यांनी केली पाहिजे. मात्र अशी व्यवस्था अर्जदार/संयोजकाने केली नसेल व कोणत्याही कारणास्तव पोलिस मदतीची जरूरी भासल्यास व्यवस्थापक पोलिस मदत मागवतील व त्याचा खर्च अर्जदार/संयोजक यांना द्यावा लागेल त्याची वसूली अनामत रकमेतून करण्यात येईल.

१९. कार्यक्रमाच्या तिकीट विक्रीसाठी जागा राखून ठेवली आहे. या जागेचा उपयोग अर्जदार/संयोजक यांना कार्यक्रम दिनांक धरून ४ दिवस अगोदर करता येईल.

मागील पानावर..

२०. प्रेक्षागृहाचे भाडे रोख स्वरूपात भरणे आवश्यक आहे.

२१. कार्यक्रमाच्या जाहिरातीचे फ लक सांस्कृतिक भवनामध्ये राखून ठेवलेल्या जागेत लावता येतील व त्यासाठी ठरलेल्या दराप्रमाणे आकार अगोदर द्यावा लागेल.

२२. सांस्कृतिक भवनामध्ये असलेल्या प्रेक्षागृहमध्ये जितक्या प्रेक्षकांची सोय केली आहे, त्यापेक्षा अधिक प्रेक्षकांना प्रेक्षागृहामध्ये प्रेक्षक म्हणून प्रवेश दिला जाणार नाही.

२३. कार्यक्रमाच्या वेळी प्रेक्षकांना त्यांच्या आसन क्रमांकाच्या जागा दाखविण्यासाठी स्वयंसेवकांची (डोअर किपर्स) व्यवस्था प्रयोग करणाऱ्या अर्जदार/संयोजक यांना करावी लागेल.

२४. सांस्कृतिक भवनामध्ये निवासाची सोय नसल्यामुळे कोणाचीही राहण्याची व्यवस्था या ठिकाणी करता येणार नाही.

२५. प्रेक्षागृह व इतर ठिकाणी खुर्च्या, टेबल इत्यादी अनुषंगीक साहित्य मागितल्यास म.न.पा. ने मान्य केलेल्या दरानुसार भाडे द्यावे लागेल. तसेच कॉन्फ रन्स हॉल मध्ये ३० पेक्षा जादा खुर्च्या लागल्यास जादा खुर्च्या टेबलाचा म.न.पा.ने ठरविलेला दर द्यावा लागेल.

२६. सांस्कृतिक भवनातील कार्यालयीन दूरध्वनीचा वापर म.न.पा. अधिकारी / कर्मचाऱ्यां व्यतिरिक्त बाहेरच्या कोणाही व्यक्तिला करता येणार नाही.

२७. प्रेक्षागृह व कॉन्फरन्स हॉल वापराबद्दल नियमात आवश्यक वाटेल तेव्हा बदल करण्याचे हक्क महापालिका आयुक्त यांना राहातील.

२८. शासकीय कार्यक्रमासाठी आरक्षण रद्द करण्याचा अधिकार व्यवस्थापनास राहील तसेच हे बदल प्रेक्षागृहाचा वापर करणाऱ्यावर बंधनकारक राहतील.

******************

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन
# पुणे महानगरपालिका

## ड) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन कडील ठेक्याची माहिती

| अनु.क्र | मक्तेदाराचे नाव व पत्ता | मक्ता प्रकार | ठराव क्रमांक | रक्कम रूपये | मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे.अश्विनी महिला विकास संस्था<br>मंगळवार पेठ, पुणे ११ | स्वच्छता | मा.स्थायी समिती ठ.क्र.१२६१ दि.७/९/२००० व मा.महापालिका आयुक्त यांचा ठ.क्र.६/२८९ दि.२१/१/२००३ अन्वये प्रतिवर्षी ५% वाढीसह दि.१/५/२००० ते दि.३०/४/२००३ पर्यंत तीन वर्षासाठी तसेच प्रतिवर्षी १०% वाढीसह दि.१/५/२००३ ते दि.३०/४/२०११ पर्यंत आठ वर्षासाठी देण्यास व त्या प्रमाणे करारनामा करण्यास मान्यता | दरमहा<br>१४,३७०/-<br>(या वर्षासाठी) | दि.१/५/२००३<br>ते<br>दि.३०/४/२०११<br>अखेर |
| २. | मे.अश्विनी महिला विकास संस्था<br>मंगळवार पेठ, पुणे ११ | सुरक्षा | मा.स्थायी समिती ठ.क्र.१२६१ दि.७/९/२००० व मा.महापालिका आयुक्त यांचा ठ.क्र.६/२८९ दि.२१/१/२००३ अन्वये प्रतिवर्षी ५% वाढीसह दि.१/५/२००० ते दि.३०/४/२००३ पर्यंत तीन वर्षासाठी तसेच प्रतिवर्षी १०% वाढीसह दि.१/५/२००३ ते दि.३०/४/२०११ पर्यंत आठ वर्षासाठी देण्यास व त्या प्रमाणे करारनामा करण्यास मान्यता | दरमहा<br>१९,०४०/-<br>(या वर्षासाठी) | ११ महिने<br>दि.०१/०४/२००५ ते<br>दि.२८/०२/२००६ अखेर |
| ३. | श्री.दिलीप वानखेडे | आचार्य नागार्जुन संग्रहालय | मा.स्थायी समिती ठ.क्र.२०८ दि.६/५/२००३ व मा.मुख्य सभा ठ.क्र.१५५ दि.२५/६/२००३ अनव्ये दि.१/४/२००३ ते दि.३१/३/२००६ या वर्षाच्या कालावधीसाठी मुदत वाढ मान्य. | (वार्षिक)<br>४३,९२५/- | दि.१/४/२००३<br>ते<br>दि.३१/३/२००६ |

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन
# पुणे महानगरपालिका

| अनु.क्र | मक्तेदाराचे नाव व पत्ता | मक्ता प्रकार | ठराव क्रमांक | रक्कम रूपये | मुदत |
|---|---|---|---|---|---|
| ४. | श्री. सुधाकर खांबे | महार रेजिमेंट संग्रहालय | मा.स्थायी समिती ठ.क्र.२०८ दि.६/५/२००३ व मा.मुख्य सभा ठ.क्र.१५५ दि.२५/६/२००३ अनव्ये दि.१/४/२००३ ते दि.३१/३/२००६ या वर्षाच्या कालावधीसाठी मुदत वाढ मान्य. | (वार्षिक) १०,५४२/- | दि.०१/४/२००६ ते दि.३१/३/२००९ |
| ५. | विजयश्री प्रतिष्ठान महिला व बालकल्याण संस्था | उपहारगृह | मा.म.न.पा.सभा ठ.क्र.३७९ दि.२४/०३/२००५ व मा.स्थायी समिती ठ.क्र.१०७२ दि.२१/१२/२००४ | दरमहा रूपये ५,५००/- (दरवर्षी १२% वाढ) | दि.१/३/२००५ ते दि.२८/२/२००८ |
| ६. | विजयश्री प्रतिष्ठान महिला व बालकल्याण संस्था | वाहनतळ | वाहनतळ मक्त्याचे काम भूमी आणि जिंदगी खात्यामार्फत केले जाते. | - | - |
| ७. | श्री संत गुरू रविदास चॅरिटेबल ट्रस्ट | बुक स्टॉल | मा.स्थायी समिती ठ.क्र.१२९६ दि.१७/१२/२००२ व मा.मुख्य सभा ठ.क्र.५१२ दि.२१/०३/२००३ अन्वये दि.२६/१२/२००१ पासून पुढील ३ वर्षासाठी प्रत्येक वर्षी १२% वाढवून रूपये ३०० मासिक भाडे आकार | रूपये दरमहा ३००/- | - |

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन
# पुणे महानगरपालिका

डॉ.आंबेडकर रोड, मालधक्का,पुणे ४११ ०११ फोन नं. & २६०५५४७६

जावक.क्र.डॉ/भवन/
दिनांक :-

## शासकीय माहिती अधिकार २००५ नुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाकडील माहिती

**शासकीय माहिती अधिकार २००५ नुसार** डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाची माहिती खालील प्रमाणे असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाकडील सर्व कामकाज मा.म.न.पा.सभा ठ.क्र.५७२ दि.२०/०३/२००१ च्या मार्गदर्शक तत्वानुसार केले जाते.

पुणे म.न.पा. च्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचे उद्घाटन ९ एप्रिल २००० रोजी मा.विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते झाले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचा वापर नियमानुसार चर्चासत्र, कार्यशाळा, नाटय,परिसंवाद,भाषणे, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक,धार्मिक, तसेच प्रबोधनात्मक इतर मनोरंजनाचे कार्यक्रम जलसा व पोवाडे यासाठी वापर करण्यात येते.

मात्र तमाशा लोकनाटय, लावणी, ऑकेस्ट्रा अशा प्रकारचे कार्यक्रम करता येत नाहीत.

### अ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचे क्षेत्रफळ खालील प्रमाणे.

- संपूर्ण भवनाचे क्षेत्रफळ - १६८०२ चौ.फुट.
- पुतळा परिसर व काचेचे घुमट - ५३ चौ.फुट
- प्रदर्शन हॉल - ४२७० चौ.फुट
- ग्रंथालय - १४५१ चौ.फुट
- वातानुकूलीत प्रेक्षागृह - ७०१६ चौ.फुट
- कॉन्फरन्स हॉल - ८२३ चौ.फुट
- कॉम्प्युटर रूम - ११४ चौ.फुट
- उपहारगृह - ३५५ चौ.फुट
- पार्किंग - ५१६४ चौ.फुट

मागील पानावर..

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन
# पुणे महानगरपालिका

डॉ.आंबेडकर रोड, मालधक्का,पुणे ४११ ०११ फोन नं. & २६०५५४७६

जावक.क्र.डॉ/भवन/
दिनांक :-



## ब) आसन क्षमता

- ❖ प्रेक्षागृह - ४००
- ❖ कॉन्फरन्स हॉल - ३५
- ❖ कॉम्प्युटर रूम - ३५

## क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनामध्ये खालील प्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत.

१) प्रेक्षागृहात वातानुकूलीत यंत्रणा आहे.

२) विशेष अतिर्थीसाठी व्ही.आय.पी. रूमची सोय आहे.

३) ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर संदर्भ ग्रंथालय’ वाचकांसाठी उपलब्ध आहे.

४) ग्रंथालयात थोर व महापुरूषांच्या जीवनावर आधारित सामाजिक,धार्मिक,ऐतिहासिक,ग्रंथ साहित्य असून रूपये १० लाखाचे ग्रंथ साहित्य उपलब्ध आहे.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुध्दांचे फोटोंचे व मूर्त्यांचे कायम स्वरूपी प्रदर्शन तसेच भारतीय लष्करातील महार रेजिमेंटचे देखील शौर्य गाथांचे कायम स्वरूपी दुर्मिळ प्रदर्शन आहे.

६) प्रदर्शन पाहण्यासाठी ‘पुणे दर्शन बस’ ची सुविधा आहे.

७) चर्चासत्र, छोटे कार्यक्रम इत्यादी करण्याची कॉन्फरन्स हॉल व कॉम्प्युटर रूमची सुविधा आहे.

८) पे अॅण्ड पार्क वाहनतळ सुविधा आहे.

९) कॅन्टींनची सोय आहे.

१०) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाची संपूर्ण माहिती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनावरील सुविचार डिस्प्ले बॉक्समध्ये दाखविण्याची सुविधा आहे.

११) दरवर्षी ९ एप्रिल ते १४ एप्रिल मध्ये ‘ भिम फेस्टिवल’ आयोजित करण्यात येतो.

मागील पानावर..

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन
# पुणे महानगरपालिका

डॉ.आंबेडकर रोड, मालधक्का,पुणे ४११ ०११ फोन नं. & २६०५५४७६

जावक.क्र.डॉ/भवन/
दिनांक :-



## इ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनातील कार्यक्रमाच्या वेळा.

- सकाळी ⟶ स. ०८.०० ते ११.००
- दुपारी ⟶ दु. १२:०० ते ३:००
- सायंकाळी ⟶ सायं. ०५ ते ८.००
- रात्रौ. ⟶ रात्रौ. ९:०० ते १२.००

## फ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथील भाडे आकारणी दर

| अ.क्र | ठिकाण | इतर कार्यक्रमासाठी | | व्यवसायिक परिषद | | अनामत (रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आडवार भाडे (रूपये) | सुट्टीचे भाडे (रूपये) | आडवार भाडे (रूपये) | सुट्टीचे भाडे (रूपये) | |
| १) | प्रेक्षागृह | १,२००/- | १,४००/- | १,३००/- | १,५००/- | १,०००/- |
| २) | कॉन्फरन्स हॉल | २५०/- | ३००/- | ३५०/- | ४००/- | २००/- |
| ३) | कॉम्प्युटर रूम | २५०/- | ३००/- | ३५०/- | ४००/- | २००/- |

१) प्रत्येक भाडे आकार व आणि भवनातर्फे पुरविण्यात येणाऱ्या वस्तूंच्या भाडेची रक्कम यावर सेवाकर १०.२% आकारला जातो.

२) चॅरिटेबल संस्थांना (रजि) थिएटर भाडे रूपये २००/- सुट कॉन्फरन्स हॉल व कॉम्प्युटर रूम भाडे रूपये ५०/- सुट देण्यात येते.

३) सुट्टीचा दिवस - दुसरा व चौथा शनिवार, प्रत्येक गुरूवार व प्रत्येक रविवार, प्रत्येक शासकीय सुट्टी.

४) किमान १ आठवडा अगोदर कार्यक्रमाचे आरक्षण करणे आवश्यक आहे.

मागील पानावर..

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन**
**पुणे महानगरपालिका**

डॉ.आंबेडकर रोड, मालधक्का,पुणे ४११ ०११ फोन नं. & २६०५५४७६

जावक.क्र.डॉ/भवन/
दिनांक :-



**ग) वरील कार्यक्रमांसाठी प्रत्येक सत्रास आवश्यकतेनुसार पुरविण्यात येणाऱ्य साहित्य आकार भाडे खालील प्रमाणे.**

| अ.क्र | साहित्याचे नाव | नग | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १. | साधी खुर्ची | १ | १०/- |
| २. | एक्झिक्युटिव्ह खुर्ची | १ | २०/- |
| ३. | टेबल | १ | २०/- |
| ४. | रोस्टम | १ | ५०/- |
| ५. | व्ही.डि.ओ. शुटींग (खाजगी) | प्रती कार्यक्रम | १५०/- |
| ६. | ऑडिओ रेकॉर्डींग (भवन) | प्रती कार्यक्रम | १००/- |
| ७. | ओव्हर हेड प्रोजेक्टर | प्रति कार्यक्रम | सामाजिक ३०/-<br>शैक्षणिक ३०/-<br>व्यवसायिक १००/- |
| ८. | एल.सी.टी.प्रोजेक्टर | प्रति कार्यक्रम | सामाजिक ३००/-<br>शैक्षणिक ६००/-<br>व्यवसायिक १०००/- |
| ९. | फोटो स्टॅण्ड | प्रति कार्यक्रम | १०/- |

- अतिरिक्त प्रकाश योजना मान्य दराने शुल्क आकारणी केली जाते.
- भवनातील साहित्य अगर इतर नुकसान झाल्यास नियमानुसार आवश्यकते शुल्क वसूल केले जाते.

**घ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संदर्भ ग्रंथालयाची माहिती खालील प्रमाणे.**

१) प्रत्येक सभासदास अनामत रक्कम रूपये ५०/-

२) १ ते १५ दिवसांसाठी फी रक्कम रूपये ५/-

३) १ ते ३१ अखेर फी रक्कम रूपये १०/- (मासिक)

४) पुस्तकांच्या पानाची झेरॉक्स नगास (पान) ०.५० पैसे.

मागील पानावर..

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन
# पुणे महानगरपालिका

डॉ.आंबेडकर रोड, मालधक्का,पुणे ४११ ०११ फोन नं. & २६०५५४७६


जावक.क्र.डॉ/भवन/
दिनांक :-



५) ग्रंथालयाची वेळ सकाळी १०: ३० ते ५:३० असून सोयीनुसार बदल करण्यात येतो.

६) मा. स्थायी समिती ठ.क्र.१/१६८९ दि. २४/०३/२००५ नुसार ग्रंथपालाची नेमणूक एकवट वेतनावर दर सहा महिनेसाठी जाहिरात देऊन केली जाते.

## ङ) सन २००६ - २००७ अखेर जमा व खर्च

१) सन २००६ - २००७ जमा - रक्कम रूपये १०,०६,८५९/-

३) सन २००६ - २००७ अखेर खर्च - रक्कम रूपये ८,७३,८३४/-

६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाकडील दुरूस्ती व देखभाल भवन रचना व विद्युत विभाग पुणे महानगरपालिका यांच्या मार्फत करण्यात येते.

************

# यशवंतराव चव्हाण नाट्यगृह
# पुणे महानगरपालिका

कोथरूड, पुणे & २५३९५२३२

जावक.क्र.यचना/
दिनांक :-

## शासकीय माहिती अधिकार २००५ नुसार
## यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची माहिती

- ❖ भूमिपूजन समारंभ ⟶ मंगळवार दि.२८/१०/१९८६
- ❖ शुभहस्ते ⟶ मा. शंकरराव चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
- ❖ उद्‌घाटन समारंभ ⟶ शनिवार दि.२५/११/२०००
- ❖ शुभहस्ते ⟶ मा.विजयसिंह मोहिते पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य.

## अ) यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाकडील क्षेत्रफळ खालील प्रमाणे

१) स्टेज क्षेत्रफळ ⟶ एकूण ६०' X ४०'

(प्रत्यक्ष वापरासाठी ) ⟶ एकूण ३०' X २०'

२) कलादालन ⟶ एकूण ७२' X २८'

३) पार्किंग क्षेत्रफळ ⟶ एकूण ६०' X ३००'

## ब) यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाकडील आसन क्षमता

१) प्रेक्षागृह आसन संख्या ⟶ एकूण ८९३

२) तळमजला ⟶ एकूण ७३६

३) बाल्कनी ⟶ एकूण १५७

मागील पानावर..

## क) यशवंतराव चव्हाण नाटयगृहातील विविध सुविधा

१) प्रेक्षागृहात वातानूकुलीत यंत्रणा आहे.

२) पे अॅण्ड पार्क वाहनतळ सुविधा उपलब्ध आहे.

३) कॅन्टींन व कॅफेटेरियाची सोय आहे.

४) नवोदित कलाकरांसाठी कलादालनाची सोय आहे. कलादालन, हस्तकला, चित्रकला, इ.प्रदर्शनासाठी उपलब्ध केले जाते.

५) कलाकरांसाठी निवास व्यवस्था व भोजन कक्ष उपलब्ध आहे.

६) विशेष अतिथींसाठी व्हि.आय.पी. रूम.

## ड) कार्यक्रमाच्या वेळा.

- सकाळी ⟶ स. ०९.०० ते ११.००
- दुपारी ⟶ दु. १२:३० ते ३:३०
- सायंकाळी ⟶ सायं. ०५ ते ८.००
- रात्रौ. ⟶ रात्रौ. ९:३० ते १२.३०
- परिषदाच्या वेळा ⟶ स. ९ ते २, (५ तास)
  स. ९ ते सायं.७ वा. (१० तास)
  दु. ४ ते रात्रौ.८ वा. (४ तास)
  किंवा पुर्ण दिवस

मागील पानावर..

# यशवंतराव चव्हाण नाटयगृह
# पुणे महानगरपालिका

कोथरूड, पुणे & २५३९५२३२

जावक.क्र.यचना/
दिनांक :-



## फ) यशवंतराव चव्हाण नाटयगृह येथील भाडे आकारणी दर

| अ.क्र | कार्यक्रम | आडवार भाडे | सुट्टीचे भाडे | अनामत |
|---|---|---|---|---|
| १. | मराठी नाटक, गीते, तमाशा, जादू, संमोहन, एकपात्री प्रयोग, भारतीय नृत्य इ. (कमाल तिकिट विक्री दर रू.६०/-) यापेक्षा जास्त दराने तिकिट विक्री केल्यास भाडे दिडपट आकारले जाईल (टिप :- संगीत नाटकास महिन्यातील प्रथम दोन प्रयोगास अर्धे भाडे आकारले जाईल.) | रू.२,५००/- + सेवाकर | रू. ३,०००/- + सेवाकर | रूपये ३,०००/- |
| २. | अन्य खाजगी संस्था (नाटय संस्था व्यतिरिक्त) | रू.३,०००/- + सेवाकर | रू. ३,५००/- + सेवाकर | रूपये ३,०००/- |
| ३. | ऑकेस्ट्रा, गझल, बॅले इत्यादी<br>(कमाल तिकिट दर रू.१००/-) यापेक्षा जास्त दराने तिकिट विक्री केल्यास किमान भाडयाचे दुप्पट दराने भाडे आकारणी केली जाईल. | (तिकिट दर)<br>५०/-<br>६०/-<br>७५/-<br>९०/-<br>१००/-<br>+ सेवाकर | (भाडे)<br>३,०००/-<br>३,२००/-<br>३,६००/-<br>३,८००/-<br>४,५००/-<br>+ सेवाकर | रूपये ५,०००/- |
| ४. | कलादालन | रू.१०००/- + सेवाकर | रू.१०००/- + सेवाकर | रूपये १,०००/- |
| ५. | परिषद भाडे<br>सत्रे:- स.९ते २, व<br>दु.४ ते सांय.८ + द्वारपालन रू ३३०/-<br><br>स.९ ते सायं ७,<br>+ द्वारपालन रू ४९५/-<br><br>स.९ते रात्रौ.१२ वा. किंवा संपूर्ण दिवस<br>+ द्वारपालन रू ६६०/- | रू.६,५००/-<br>(५ तास)<br><br><br>रू.१३,०००/-<br>(१० तास)<br><br>रू.१९,५००/-<br>(संपूर्ण दिवस) | रू.६,५००/-<br>(५ तास)<br><br><br>रू.१३,०००/-<br>(१० तास)<br><br>रू.१९,०००/-<br>(संपूर्ण दिवस) | अनामत रू ५,०००/- |
| ६. | बालनाटय | ५००/- | ५००/- | ५००/- |

मागील पानावर..

यशवंतराव चव्हाण नाटयगृह खास बाब म्हणून बालनाट्यासाठी, दिर्घ शैक्षणिक सुट्टी (दिवाळी, नाताळ, उन्हाळयाची सुट्टी) यातील निश्चित केलेल्या तारखांना रविवार व्यतिरिक्त सकाळी ९ ते ११ चे सत्र उपलब्ध करून दिले जाते.

## ग) इतर भाडे आकार

| | | | |
|---|---|---|---|
| १) | व्ही. आय. पी.रूम | (प्रती सत्र) | ५० /- |
| २) | व्ही.आय.पी खुर्ची (प्रती सत्र) | ( १ नग) | २०/- |
| ३) | टेबल (प्रतीसत्र) | ( १ नग) | २५/- |
| ४) | लेव्हल (प्रतीसत्र) | ( १ नग) | १०/- |
| ५) | रांगोळी सफाई | प्रती कार्यक्रम | १००/- |
| ६) | सेट (प्रतीसत्र) | ( १ नग) | १५०/- |
| ७) | कमान बाहेरील गेट (१ दिवसास) | (१ नग) | २००/- |
| ८) | रंगीत पडदा (प्रतीसत्र) | (१ नग) | ५०/- |
| ९) | ५०० W हॅलोजन किंवा स्पॉट व इस्त्री | (१ नग) | ३०/- |
| १०) | १००० W हॅलोजन पार किंवा स्पॉट (कंपनी) | | २०/- |
| ११) | ५०० W हॅलोजन किंवा स्पॉट (कंपनी) | (१ नग) | १०/- |
| १२) | २००० W सोलर | (१ नग) | १००/- |
| १३) | २००० W सोलर (कंपनी) | (१ नग) | ५०/- |
| १४) | डिस्को लाईट (कंपनी) | (१ नग) | १०/- |
| १५) | लाईट इफेक्ट १००० W (कंपनी) | (१ नग) | २०/- |
| १६) | कॉलर माईक व कॉडलेस माईक (१ नग) | | ३५०/- |

मागील पानावर..

| | | | |
|---|---|---|---|
| १७) | ऑडिओ इनपूट व आऊट पूट (कंपनी) | प्रति कार्यक्रम | १००/- |
| १८) | व्हिडिओ शुटींग (कंपनी) | प्रति कॅमेरा | १५०/- |
| १९) | टि.व्ही. मॉनिटर व कॉम्प्युटर (कंपनी) | (१ नग) | १०/- |
| २०) | एल.सी.डी प्रोजेक्टर व फिल्म प्रोजेक्टर | (१ नग) | २०/- |
| २१) | माईक साधा व मायक्रोफोन | (१ नग) | २००/- |
| २२) | टेप रेकॉर्डर | (१ नग) | १००/- |
| २३) | सिडीप्लेअर | (१ नग) | २००/- |
| २४) | स्पिकर मॉनिटर व १ माईक कलादालन | | ३००/- |

२५) आवारातील विद्युत रोशनाई व इमारत विद्युत रोशनाई (मिटर रिडींग प्रमाणे व लोड प्रमाणे)

२६) अतिरिक्त प्रकाश योजना मान्य दराने शुल्क आकारणी केली जाते.
नाटयगृहाच्या आवारात मोकळया जागेत मांडव, स्टॉलसाठी मान्य दराने शुल्क आकारणी केली जाते. वाहनतळ, कॅन्टींन येथील जागा वापरास संबंधीत ठेकेदराची संमती आवश्यक आहे.

२७) नाटयगृहातील साहित्य अगर इतर नुकसान झाल्यास त्यानुसार आवश्यक ते शुल्क वसूली केले जाते.

## घ) सन २००६ – २००७ अखेर जमा व खर्च

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सन २००६ - २००७ जमा | - | रक्कम रूपये ४२,८६,९४१/- |
| ३) | सन २००६ - २००७ खर्च | - | रक्कम रूपये २७,६०,९६०/- |

मागील पानावर..

## च) यशवंतराव चव्हाण नाटयगृह आरक्षण पध्दती

**चौमाही आरक्षण :-**

नाटयगृहाचे आरक्षण दर चौमाहीसाठी केले जाते.या चौमाही पुढील प्रमाणे आहेत.

अ) माहे जानेवारी ते माहे एप्रिल

ब) माहे मे माहे ऑगस्ट

क) माहे सप्टेंबर ते माहे डिसेंबर

१) या चौमाही आरक्षणामध्ये गुरूवार, दुसरा व चौथा शनिवार, रविवार आणि शासकीय सार्वजनिक सुट्टया या दिवसांचे दुपारी १२: ३०, सायं.५:०० वाजता व सर्व महिन्याचे रात्रौ.९:३० चे प्रयोगाचा समावेश आहे.

२) या चौमाही आरक्षणासाठी अर्जदाराने म.न.पा.ने निश्चित केलेल्या छापिल फॉर्म मध्ये किंवा संस्थेच्या लेटर हेडवर संपूर्ण माहितीसह अर्ज केला पाहिजे. आरक्षण मागणी अर्ज रंगमंदिर कार्यालयात खाली नमूद केलेल्या मुदतीमध्ये सकाळी १०:३० ते सांयकाळी ५: ३० यावेळेत स्विकारले जातात. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जात नाही.

| अनु.क्र | चौमाही | अर्ज स्विकारण्याची मुदत |
|---|---|---|
| १. | माहे जानेवारी ते माहे एप्रिल | दि.१५ ते २५ नोव्हेंबर |
| २. | माहे मे ते माहे ऑगस्ट | दि.१५ ते २५ मार्च |
| ३. | माहे सप्टेंबर ते माहे डिसेंबर | दि.१५ ते २५ जुलै |

३) आरक्षण मागणी अर्जासोबत आवश्यक ती अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

४) आरक्षित तारखेच्या प्रयोगाचे भाडे संबंधितांनी प्रयोग दिनांकापूर्वी १५ दिवस अगोदर (प्रयोगाचा दिनांक धरून) भरणे आवश्यक आहे.

मागील पानावर..

मुदतीत भाडे न भरल्यास सदर आरक्षण रद्द झाल्याचे समजण्यात येते व ती तारीख अन्य संस्थेस देण्याचा अधिकार मा.मुख्य व्यवस्थापक, सांस्कृतिक केंद्रे, पुणे म.न.पा. यांना आहे.

## छ) यशवंतराव चव्हाण नाटयगृह दुरूस्ती व देखभाल

यशवंतराव चव्हाण नाटयगृहाकडील दुरूस्ती व देखभाल भवन रचना व विद्युत विभाग, पुणे महानगरपालिका यांच्या तर्फ करण्यात येते.

# इ) यशवंतराव चव्हाण नाटयगृहकडील ठेक्यांची माहिती :-

| अनु.क्र | मक्तेदाराचे नाव व पत्ता | मक्ता प्रकार | ठराव क्रमांक | दरमहा रक्कम रूपये | मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | सौ.कमल अंकुश मारणे<br>रा.सर्व्हे नं.२२/७८ जैन हाईटस् पहिला मजला<br>बालाजी नगर, धनकवडी<br>पुणे ४३. फोन नं.९४२२०३५५८४ | **द्वारपालन** | मा.अति.महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र.८/१४५०<br>दि.२२/०३/२००५.<br>मा.स्थायी समिती ठराव क्र. १३७.दि.२२/०४/२००३ | प्रति प्रयोग<br>रू.१६४.९९/-<br>किमान ८ सेवक<br>कमाल १० सेवक | ११ महिने<br>दि.२३/०२/२००६ ते<br>दि.२१/०१/२००७ अखेर<br>११ महिनेसाठी<br>दि.२२/०१/२००७ पासून<br>३ महिने मुदत वाढ नविन<br>मान्यता प्रक्रिया चालू |
| २. | श्री.बाळकृष्ण सिताराम कलाल<br>रा.२४५/४६ भवानी पेठ, पुणे<br>फोन नं.२६९३१५९६ | **फलक व्यवस्था** | मा. मुख्य सभा ठराव क्र.१०६ दि.२२/०५/२००३ | सिंगल बोर्ड रू ४५/-<br>डबल बोर्ड रू ९०/- | नविन मान्यता प्रक्रिया चालू |
| ३. | स्नेह बचत गट<br>द्वारा. सौ.विद्या अ.गव्हाणे<br>सिध्दार्थ चौक पाण्याच्या टाकीजवळ,<br>वारजे माळवाडी पुणे फोन.२५२९१९२८ | **स्वच्छता मक्ता** | मा.स्थायी समिती ठराव क्र. १६८८ दि.२४/०३/२००५<br>मा. मुख्य सभा ठराव क्र.१८ दि.२७/०४/२००५ | रूपये १४,०००/-<br>५ पुरूष<br>५ स्त्रिया | ३ वर्ष<br>दि.०१/०४/२००५ ते<br>दि.३१/०३/२००८ |
| ४. | मे. सुनिल केटर्स<br>श्री. सुनिल खले<br>बराटे चाळ कर्वे नगर पुणे ५२ | **कॅन्टींन मक्ता** | मा.महापालिका आयुक्त ठ.क. ६/६८०<br>दि.०३/११/२००६ ने मान्य | दरमहा रूपये १६,९९९/- | ११ महिने<br>दि.२१/११/२००६ ते<br>दि.२०/१०/२००७ |
| ५. | श्री.अंकूश दिनकर मारणे.<br>१४२ भेलके नगर, कोथरूड पुणे<br>फोन नं.९४२२०३५५८४ | **वाहनतळ मक्ता** | मा.स्थायी समिती ठराव क्र. १०६७ दि.२९/१०/२००५ | दरमहा रूपये ९,११०/- | ३ वर्ष<br>दि.०५/१२/२००२ ते<br>दि.०४/१२/२००५ पर्यंत |
| ६. | मे.अर्थवरथी इलेक्ट्रिक्लस<br>श्री.संजय गरूड<br>स.११/१ पद्मावती पाटील लेन, चव्हाण नगर,<br>धनकवडी पुणे - मो.नं. ९८२२३५६००२ | **एसी यंत्रणा वार्षिक देखभाल दुरूस्ती** | मा.महा. सहा.आयुक्त( टे) ठराव क्र.२/२५२<br>दि.०३/११/२००४<br>**(विद्युत खात्यामार्फत मक्ता)** | दरमहा रूपये -<br>१४,८५०/- | ११ महिने<br>दि.११/१०/२००६ ते<br>दि.११/०९/२००७ पर्यंत |
| ७. | मे. गणेश इलेक्ट्रिक्लस वर्क्स,<br>३४/९/७ धनकवडी पुणे ४३<br>फोन नं. ९८२२३५६००२ | **लाईट साऊंड सिस्टिमचे वार्षिक ऑपरेटींग करणे** | मा.अति.महापालिका आयुक्त ठराव क्र.९/१४७३<br>दि.०२/१२/२००५ नुतनीकरण मान्यता घेण्याची<br>कार्यवाही चालू आहे.<br>**(विद्युत खात्यामार्फत मक्ता)** | दरमहा रूपये -<br>१५,५००/- | ११ महिने<br>दि.१७/११/२००६ ते<br>दि.२८/१०/२००७ पर्यंत |